# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## ग प्रभाग कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक - ११
## सभावृत्तांत

दिनांक - ५/३/२०१९ वेळ - **सकाळी** ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दि.५/३/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन - सभापती**
२. मा. डब्बु आसवानी (हिरानंद)
३. मा. पवार मनिषा प्रमोद
४. मा.बारणे अर्चना तानाजी
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
७. मा.सविता बाळकृष्ण खुळे
८. मा.सुनिता हेमंत तापकीर
९. मा.चंद्रकांत बारकु नखाते
१०. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
११. मा.गोपाळ काशिनाथ माळेकर - स्विकृत सदस्य
१२. मा.विनोद हनुमंत तापकीर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्रीम.स्मिता गंगाराम झगडे – क्षेत्रिय अधिकारी, श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, श्री.ए.के.सुपे - लेखाधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.देवन्ना गट्टुवार – कार्यकारी अभियंता (स्थापत्य),श्री.व्ही.बी.ओहोळ, श्री.विजयकुमार काळे – उपअभियंता स्थापत्य, श्री.आर.डी.सुर्यवंशी - कनिष्ठ अभियंता(BRTS), श्री.सुनिल बागवानी – कार्यकारी अभियंता, नगररचना,श्री.बाबासाहेब गलबले - कार्यकारी अभियंता,विद्युत, श्रीमती अनुश्री कुंभार – उप अभियंता,विद्युत, श्री.पी.पी.पाटील – कार्यकारी अभियंता, जलनि:सारण, श्री.बंडगर एस बी – कनिष्ठ अभियंता,जलनि:सारण, श्री.भाऊसाहेब साबळे – उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.पी पी पाटील –

कार्यकारी अभियंता,जलनि:सारण, श्री.मगर एस एम –कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, श्रीम.सानप ए.व्ही, श्री.कोरेवार, श्री.गजपुरे व्ही पी, कलाल आय के – कनिष्ठ अभियंता,स्थापत्य, श्री.जे व्ही पटेल – सहाय्यक उद्यान अधिक्षक, श्री.कोटीयाना डी एम – आरोग्य निरीक्षक,श्री.सरवदे - अतिक्रमण पथक प्रमुख,श्री.रामेश्वर पवार – सहा.शिक्षक, माध्यमिक शिक्षण,इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

दि. ७/१/२०१९ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. १० ) कायम करणेत येत आहे.

ठराव क्रमांक - विषय क्रमांक - १

दिनांक- ५/०२/२०१९

सूचक- मा. अनुमोदक- मा.

संदर्भ – मा. निकीता कदम यांचे दिनांक १९/१२/२०१८ चे पत्र..

मा.निकीता कदम यांचे दिनांक १९/१२/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मिलिंदनगर पिंपरी या ठिकाणी संतोषी माता मंदीरामागे सार्वजनिक वाचनालय बांधणेत यावे, तरी सदर जागा हि पालिकेच्या मालकिची असुन त्या ठिकाणी वाचनालय व समोरील बाजुस सिमेंट कॉंक्रिटीकरण करुन देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(सदर विषयाबाबत झोनिपु विभागाचा अभिप्राय घेणेत यावा)

सदर विषय तहकुब करणेत येत आहे.

------

## सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेला विषय खालीलप्रमाणे

ठराव क्रमांक - विषय क्रमांक - १

दिनांक- ५/०२/२०१९

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.चंद्रकांत नखाते

संदर्भ – मा.डब्बु आसवानी (हिरानंद) यांचे दिनांक ४/०२/२०१९ चे पत्र..

ॲड.जी.डी.चांदवानी हे ग प्रभागातील नागरिक होते. ते सन १९६० मध्ये पिंपरीत वास्तव्यास आले होते. त्यांनी पिंपरी कॅम्प व सिंधी समाजासाठी खुप मोठे योगदान दिलेले होते. तरी पिंपरी शहराची व सिंधी बांधवांच्या आर्थिक प्रगतीची उभारणी करण्यासाठी त्यांच्या दुरदृष्टीने दि सेवा विकास बॅंकेची स्थापना त्यांनी केली व ते प्रथम बॅंकेचे चेअरमन असून, सन २००७ सालापर्यंत बॅंकेचे डायरेक्टर या पदावर कार्यरत हाते.

तसेच ते स्वतंत्र सेनानी हेमु कलानी यांच्या नावांनी त्यांनी कोऑप हौ.सोसायटी स्थापन करुन त्याअंतर्गत सिंधी बांधवांच्या ऐकीला घट्ट करण्याचे कार्य देखील केले आहे.

तसेच ते समाजातील गोरगरीब लोकांसाठी मोफत न्यायालयीन कामे करायचे, ते सिटी फोरम पिंपरीचे चेअरमन होते. ते पिंपरी टेक्सटाईल्स ट्रेड असोसिएशनचे सचिव देखील होते व राष्ट्रीय सिंधी पंचायतीचे ते चेअरमन होते. असे बहुअयानी कर्तुत्ववान सामाजिक जाणिव असणारे ज्येष्ठ ऍडव्होकेट जी.डी.चांदवानी यांचे कार्य लोकांना प्रेरणा देण्यासाठी व लोकांच्या मनात त्यांच्या विषयीचा सन्मान वाढवण्यासाठी ते वास्तव्य करीत असलेल्या ठिकाणाच्या मार्गाला/चौकाला त्यांचे स्व.ऍड.गोविंदराम धालुमल चांदवानी असे नामकरण देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(सदर विषयाबाबत स्थापत्य विभागाचा अभिप्राय घेणेत यावा)

सदर विषय तहकुब करणेत येत आहे.

------

**दि. ५/०२/२०१९ रोजी सकाळी १२.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे चर्चा झाली.**

मा.अध्यक्ष श्री.बाबासाहेब त्रिभुवन यांचे अनुमतीने सभेस सुरुवात करण्यात आली.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** प्रभाग क्र.२१ मिलिंदनगर,पिंपरी येथील वाचनालय बांधणेबाबत झोनिपु विभागाचा अभिप्राय घेणेत यावा.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) -** सदर ठिकाणची जागा पाहुन ती कोणाच्या अखत्यारीत आहे, याची खात्री करायला सांगितले होते.

**श्री.देवान्ना गट्टुवार (कार्यकारी अभियंता)-** याबाबत झोनिपु स्थापत्यविभागामार्फत पाहणी केली जाईल.

**मा.संदिप गाडे –** ड्रेनेज विभागाने सक्शन गाडया उपलब्ध करुन द्याव्या. ठेकेदाराच्या किती गाडया आहेत व कुठे देण्यात आलेल्या आहेत, याची माहिती द्या.

**मा.चंद्रकांत नखाते –** प्रभाग क्र.२१,२३,२४ व २७ मध्ये कचरागाडया येत नाहीत. रहाटणी, तापकीर मळा येथे कचरा उचलला जात नाही. कचरा टाकणा-या लोकांवर कारवाई केली जात जात नाही. पावत्या फाडायला किती लोक आहेत?

.

**श्री.एस एस कुळकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी) –** जलनि:सारण विभागाचे खोदकाम चालु असल्याने कचरा गाडी जाण्यासाठी मार्ग नाही, त्यामुळे कचरागाडीवरील कर्मचारी शिटी वाजवुन नागरिकांकडुन कचरा गोळा करतात.

**मा.चंद्रकांत नखाते –** बीआरटी रोड जवळील ड्रायव्हर कॉलनी येथे नवीन लाईन चोक अप होते. ड्रेनेज चोक अप काढण्यासाठी गाडया वेळेवर येत नाही.

**श्री.एस.बी.बंडगर (कनिष्ठ अभियंता) –** लवकरात लवकर ड्रेनेज चोक अप काढण्यात येईल.

वरीलप्रमाणे नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल असे सांगुन सर्वांचे आभार मानुन मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/ /२०१९
दिनांक - /०२/२०१९

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही